# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २७.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २६/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ०३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२६/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन हटटा ०३,आ.बाळापुर ०२,नर्सी ना.०१,हिंगोली शहर ०१ ,हिंगोली ग्रा.०१ असे एकुण ०८ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ४२.६६ लिटर दारू असा एकुण १९,४६०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. २६/०८/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे आ.बाळापुर ०२,औंढा ना ०१ असे एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण ६,८९०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी :—**दिनांक २६/०८/२०२२ रोजी फिर्यादी आनंदा प्रकाश सावळे रा एकांबा ता जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रा.येथे कलम ३७९ ,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२४.०८.२०२२ रोजीचे २३.०० ते २५.०८.२२ चे ०७.०० वा चे दरम्यान मौ एकांबा येथे फिर्यादीचे घरासमोर आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे एक लाल पांढ—या रंगाची हायड्रोलीक ट्रॉली जीचा पासींग क्र OM6TTIP48/12/2002 असा असलेली किअ ५१,००० रू ची चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रा.पोलीस तपास करित आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय येथे शालेय विदयार्थ्यांना पोलीस दलाविषयी मार्गदर्शन देवुन सायबर गुन्हयासंदर्भात जनजागरूती करण्यात आली:—

दिनांक २६/०८/२०२२ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली येथे जिल्हा परिषद शाळा वाकोडी येथील शालेय विदयार्थ्यांना पोलीस दलात चालणारे कामकाजा विषयी माहिती देवुन त्यांना सायबर गुन्हयांचे प्रकार व त्यापासुन आपला बचाव कसा करावा या विषयी मा. पोलीस अधीक्षक एम. राकेश कलासागर यांचे मार्गदर्शनात सायबर सेल येथील महिला पोलीस उपनिरीक्षक भाग्यश्री कांबळे तसेच पोलीस अंमलदार प्रमोद थोरात, जयप्रकाश झाडे, दत्तात्रय नागरे, रोहित मुदीराज, सुमीत टाले, इरफान पठान व रमा ठोके यांनी सायबर गुन्हयासंदर्भात सविस्तर माहिती दिली.

